# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४.(थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

जा. क्र. अ.अ.(मु)/परिपत्रक(एन्लिस्टमेंट)/३८ दिनांकः ०६.०१.२०१६

## *** परिपत्रक क्र. १७३ ***

**विषय: प्राधिकरणाकडे** मान्यता प्राप्त पुरवठादार म्हणुन नोंदणी करण्याकरीता/जुन्या नोंदणीचे नुतनीकरण करणे या करीता मार्गदर्शक सूचना, आवश्यक असलेल्या बाबी व अर्जाचा नमुना ई.बाबत.

**संदर्भ:** या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १५९, दिनांक ०८.०६.२०१५.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात येणाऱ्या ग्रामिण तसेच नागरी पाणी पुरवठा योजनांकरीता आवश्यक असलेले विविध प्रकारचे साहित्य हे उत्तम प्रतीचे तसेच चांगल्या उत्पादकाकडून प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्राधिकरणामार्फत अशा उत्पादकांची यादी तयार करण्यात येते. त्याकरीता आवश्यक त्या सविस्तर सूचना संदर्भिय परिपत्रकाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, बरेच उत्पादक हे प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याची तपासणी करुन प्राधिकरणामार्फत उपस्थित करण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता ही महिनोनमहिने करीत नाहीत. त्यामुळे बरेचशे प्रस्ताव हे प्राधिकरणाच्या नोंदणी शाखेकडे प्रलंबित राहतात. असे प्रस्ताव हे विहीत कालावधीत निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रस्तावाची सखोल पडताळणी करुन त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या त्रुटींची पूर्तता संबंधित उत्पादकाने त्यांना कळविलेल्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक असलेबाबत संदर्भिय परिपत्रकात नमूद करण्यात आलेले आहे. **त्यामध्ये आता सुधारणा करण्यात येऊन सदरची मुदत ही सहा महिन्याऐवजी एक महिना करण्यात येत आहे**. जर उत्पादकांनी त्रुटींची पूर्तता वेळेत केली नाही तर त्यांनी सादर केलेला प्रस्ताव हा दप्तरदाखल करण्याची कार्यवाही करुन भरलेले नोदणी शुल्क हे जप्त (forfeit) करुन प्राधिकरणाकडे जमा करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रकाच्या दिनांकापासून प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालय येथे संदर्भिय परिपत्रकाव्दारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना आणि अर्हतानुसार प्रस्ताव तपासून स्विकृत करण्या करिता एका जबाबदार उप अभियंता यांची नेमणूक करावी व नेमणुक केलेल्या उप

अभियंता यांनी उत्पदकांच्यामार्फत सादर केलेल्या नोंदणी (Enlistment) प्रस्ताव हा या मार्गदर्शक सुचना व अर्हतानुसार असल्यास स्विकृत करुन पोच देणे आवश्यक राहील व प्रस्ताव मार्गदर्शक सुचना व अर्हतानुसार नसल्यास तो प्रस्ताव स्विकृत केला जाणार नाही.

(संतोष कुमार)
**सदस्य सचिव**

**प्रत:** **संचालक** (तां.), मजीप्रा, मजीप्रा.

**प्रत:** मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ____________

**प्रत:** **संचालक** (वित्त), मजीप्रा, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.

**प्रत:** अधीक्षक अभियंता (मु.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना माहिती तसेच आपले कार्यालयाकडे यापूर्वी प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत असे निर्देश देण्यात येतात की, या परिपत्रकातील निर्देशानुसार ज्या उत्पकादाकांच्या प्रस्तावातील त्रुटी संबंधितांना कळवून देखिल सुमारे एक महिन्याच्या कालावधीत संबंधितांनी पूर्तता केलेली नाही आहे असे सर्व प्रस्ताव दप्तर दाखल करण्यात यावेत व तसे संबंधित उत्पादकाना कळवावे.

**प्रत:** अधीक्षक अभियंता (यां.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

**प्रत:** अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ____________

**प्रत:** कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ____________